# महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ

महाराष्ट्रात विविध ठिकाणी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याचे कामकाज महामंडळामार्फत सुरु आहे. महामंडळाच्या कार्यालयातील खालील पदे करार पध्दतीने भरण्यासाठी पात्र उमेदवारांची थेट मुलाखतीद्वारे नेमणूक करण्यात येणार आहे. शैक्षणिक अर्हता व पात्रता निकष पुढीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| क्र. | पद | शैक्षणिक अर्हता व पात्रता निकष |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठातील स्थापत्य शाखेतील पदविका (Diploma / BE - Civil Engineering / B. Tech) धारण केलेली असावी.<br>– शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी/ फर्म इ.. कार्यालयात कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) म्हणून किमान ०५ वर्षे इतक्या कालावधीचा कामाचा अनुभव असावा.<br>– गृहनिर्माण व बांधकाम क्षेत्रातील विशेषत: Mivan बांधकाम तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील (Site) अनुभव असल्यास प्राधान्य.<br>**पुढील कामकाजांचा अनुभव असणे आवश्यक -**<br>– तसेच विशेषत: अंदाजपत्रक तयार करणे, दर विश्लेषण तयार करणे, सर्वेक्षण करणे, बांधकाम पर्यवेक्षण, निविदा दस्तऐवज तयार करणे इ.. बाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>– पीएमसी / कंत्राटदार यांची देयके तपासण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>– तांत्रिक विभागातील व बांधकाम क्षेत्रातील सर्व प्रकारचे कामकाज हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>– AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| २ | **कनिष्ठ अभियंता (विद्युत)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठातील विद्युत शाखेतील पदविका (Diploma / BE - Electrical Engineering) धारण केलेली असावी.<br>– शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी/ फर्म इ.. कार्यालयात कनिष्ठ अभियंता (विद्युत) म्हणून किमान ०५ वर्षे इतक्या कालावधीचा कामाचा अनुभव असावा.<br>**पुढील कामकाजांचा अनुभव असणे आवश्यक -**<br>– विस्तृत इलेक्ट्रिकल बिल्डींग सेवा, अभियांत्रिकी डिझाइन आणि विश्लेषण इ.. चे ज्ञान असणे आवश्यक.<br>– AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |

| क्र. | पद | शैक्षणिक अर्हता व पात्रता निकष |
|---|---|---|
| ३ | वास्तुविशारद | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेची वास्तुशास्त्र / वास्तुविशारद या विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. Council of Architecture, नवी दिल्ली यांचे नोंदणीकृत सदस्य असावे.<br>– शहरी नियोजन प्रामुख्याने शासकीय / निमशासकीय संस्था, सार्वजनिक उपक्रम कंपनी किंवा शहरी स्थानिक मंडळामध्ये वास्तुविशारद म्हणून किंमान ०५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>**पुढील कामकाजांचा अनुभव असणे आवश्यक -**<br>– पीएमसीने प्लॅनिंगच्या दृष्टीकोनातून सादर केलेल्या प्लॅनची छाननी व पुर्नरावलोकन करणे.<br>– सध्याच्या विकास योजनांवर आधारित विकास प्रस्ताव तयार करणे आणि धोरणांची शिफारस करणे.<br>– वर्तमान झोनिंग किंवा इमारत कोड, पर्यावरणीय नियम आणि इतर कायदेशीर नियम याबाबत अद्ययावत असणे आवश्यक.<br>– Development Control and Promotion Regulations २०३४ व Unified Development Control and Promotion Regulations चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>– साईट पाहणी करणे व त्याअनुषंगाने प्लॅनिंग करण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>– AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ४ | लेखाधिकारी | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठाची वित्तीय व्यवस्थापनातील (MBA) (Accounting & Finance) ही पदवी धारण केलेली असावी व शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बॅकिंग क्षेत्रात किमान ३ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>**अथवा**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठाची BBA in Finance Management ही पदवी धारण केलेली असावी व शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बॅकिंग क्षेत्रात किमान ५ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>**अथवा**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठातून Accounting and Finance या विषयातील पदव्युत्तर पदवी / पदवी धारण केलेली असावी व शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बॅकिंग क्षेत्रात किमान ७ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>**पुढील कामकाजांचा अनुभव असणे आवश्यक -**<br>– वित्त विभागातील सर्व प्रकारचे कामकाज हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>– पीएमसी व कंत्राटदार यांच्या देयकांची पडताळणी करण्याचा अनुभव असणे आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| | | – आर्थिक नियोजन, जमा व खर्चाचे पत्रके तयार करण्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>– Cash Flow तयार करण्याचे ज्ञान असणे आवश्यक.<br>– वैधानिक कर भरणेसंबंधी ज्ञान असणे आवश्यक.<br>– लेखे तपासणी संदर्भात ज्ञान असणे आवश्यक.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ५ | **सहाय्यक विपणन / पणन अधिकारी** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठाची MBA in Marketing Management ही पदवी धारण केलेली असावी व शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बॅंकिंग क्षेत्रात किमान ३ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>**अथवा**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठाची BBA in Marketing Management ही पदवी धारण केलेली असावी व शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बॅंकिंग क्षेत्रात किमान ५ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>**अथवा**<br>– मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी / पदवी धारण केलेली असावी व शासकीय / निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बॅंकिंग क्षेत्रात किमान १० वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक.<br>**पुढील कामकाजांचा अनुभव असणे आवश्यक -**<br>– विपणन (Marketing) विभागातील सर्व प्रकारचे कामकाज हाताळण्याचा प्रदीर्घ अनुभव असणे आवश्यक.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ६ | **आरेखक** | **शैक्षणिक पात्रता:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची विज्ञान विषय घेऊन १२ वी परीक्षा किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता तसेच स्थापत्य (अभियांत्रिकी) मधील पदविका किंवा शासकीय अथवा शासन मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची आरेखन या विषयाची प्रमाणपत्र परीक्षा प्रथम क्षेणीत उत्तीर्ण होणे आवश्यक.<br>**अनुभव व कार्ये :-**<br>– शासकीय / निमशासकीय संस्था व खाजगी संस्थेत किमान ०५ वर्ष कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>– संगणक प्रणालीतील AUTO-CAD प्रणालीचा अभ्यासक्रम पूर्ण असणे आवश्यक.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ७ | **लिपिक टंकलेखक** | **शैक्षणिक पात्रता:** मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेची पदवी धारण केलेली असावी.<br>**अनुभव :-**<br>– शासकीय / निमशासकीय संस्था व खाजगी संस्थेत किमान ३ वर्ष कामकाजाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. |

| | | |
|---|---|---|
| | | – शासकीय कार्यालयातील पत्रांचे मसुदे, कार्यालयीन टिप्पणी, बैठकींचे इतिवृत्त तयार करण्याचे ज्ञान असणे आवश्यक.<br>– मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र.मि वेगमर्यादा व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादा याचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>– संगणकीय ज्ञान असणे आवश्यक.<br>– उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. |
| ८ | **शिपाई** | **शैक्षणिक पात्रता:** उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>**अनुभव :-**<br>उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असावे. |

**टिप:**

१. उपरोक्त पदासाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची मुलाखतींद्वारे निवड करण्यात येईल.
२. योग्य उमेदवार प्राप्त झाल्यास प्रत्येक पदासाठी (१:३) प्रमाणात निवडसूची तयार करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.
३. आवश्यकतेनुसार पदसंख्या निश्चित करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.
४. उमेदवाराची गुणवत्ता व पदासाठीचा असलेला अनुभव विचारात घेऊन त्याचे दरमहा ठोक पारिश्रमिक निश्चित करण्याचे तसेच कमी/जास्त करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.
५. उपरोक्त पदांवरील भरती ही महामंडळाद्वारे वेळोवेळी ठरविलेल्या शर्ती व अटींच्या अधीन राहील, तसेच उपरोक्त पदांचा कालावधी कमी/अधिक करण्याचा अधिकार महामंडळास राहील.

**कंत्राटी पदाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील:-**

१. उमेदवाराने विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा.
२. उमेदवाराने अर्जावर अलीकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो चिकटवून फोटोवर उमेदवारांनी स्वाक्षरी करावी.
३. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे/दिशाभूल केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.
४. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र/अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
५. निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न दर्शविता स्थगित/रद्द अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
६. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवडी संबंधित कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.
७. शैक्षणिक अर्हता: उमेदवाराने अर्जासोबत वयाचा दाखला म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक अर्हतांची गुणपत्रक / प्रमाणपत्र कागदपत्रे (सत्र गुणपत्रकांसहित) व पदवी / पदव्युत्तर प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र व

मुलाखतीच्या अनुषंगाने इतर आवश्यक मुळ कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित प्रतींचा एक संच आपल्या अर्जासोबत जोडावा व मुलाखतीस मूळ कागदपत्रांसह हजर रहावे.

८. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याचे सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल.

९. सदरची पदे पदे कंत्राटी व एकत्रित मासिक पारिश्रमिक तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीकरिता असल्यामुळे त्यांना नियमित आस्थापनेवर असलेल्या पदांना असणारे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच तात्पुरत्या स्वरुपाची पदस्थापना असल्याने कालावधी कमी - अधिक करण्याचे सर्वस्वी अधिकार महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ यांना राहतील.

१०. शासकीय/ निमशासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यलय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज सादर करणे आवश्यक राहील. (सदरील परवानगी पत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक)

११. निवड झालेल्या उमेदवारास ०७ दिवसाच्या आत नियुक्त केलेल्या ठिकाणी रुजू व्हावे लागेल. विहित मुदतीत रुजू न झालेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल. (उमेदवारास ७ दिवसांच्या आत रुजू होणे शक्य नसल्यास त्यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळास त्यासंदर्भात पत्रव्यवहार करावा)

१२. निवड प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांशी करण्यात येणारा संपूर्ण पत्रव्यवहार आणि सूचना या उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडी वरच कळविण्यात येतील. त्यामुळे उमेदवारांनी मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अर्जात काळजीपूर्वक व अचूक नमूद करावा.

१३. उमेदवारास मुलाखतीकरिता स्वखर्चाने यावे लागेल व मुलाखतीकरिता येणारा खर्च कार्यालयामार्फत दिला जाणार नाही.

**कंत्राटी तत्त्वावरील पदांसाठी करावयाच्या अर्जाचा विहित नमुना**

**प्रति,**
**मा. व्यवस्थापकीय संचालक तथा मु. का. अ.**
**महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ,**
**३ रा मजला, साखर भवन, रामनाथ गोयंका मार्ग,**
**नरीमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.**

विषय : ---------------------------------- या पदासाठी अर्ज.
संदर्भ : ---------------------------------- या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहिरात.

| अ.क्र. | अर्जदाराची माहिती | | सविस्तर तपशील |
|---|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | |
| २. | जन्मतारीख | : | |
| ३. | पत्र व्यवहारासाठीचा पत्ता | : | |
| ४. | अर्जदाराचा दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक | : | |
| ५. | ई-मेल आयडी (Email ID) | : | |
| ६. | पॅन क्रमांक | : | |
| ७. | आधार क्रमांक | : | |
| ८. | शैक्षणिक अर्हता | : | |

| क्र. | अभ्यासक्रम | संबंधित विद्यालयाचे/ महाविद्यालयाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | एस.एस.सी. (१० वी) | | | |
| २. | एच.एस.सी. (१२ वी) | | | |
| ३. | पदवी | | | |
| ४. | पदव्युत्तर | | | |
| ५. | विशेष प्राविण्य | | | |
| ६. | टंकलेखन अर्हता (लागू असल्यास) | | | |

...२

| क्र. | अर्जदाराची माहिती | | सविस्तर तपशील |
|---|---|---|---|
| ९. | सेवेतील कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) प्रमाणपत्रासह | : | |
| | | | |

| क्र. | कार्यालयाचे नाव | कार्यालयातील पद | कालावधी | प्राप्त होत असलेला वार्षिक पगार (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सेवेतील एकूण अनुभव | : | |
| १०. | संगणकाचे ज्ञान / एमएससीआयटी प्रमाणपत्र | : | |

**टीप : शैक्षणिक अर्हता व अनुभव प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.**

स्थळ :

दिनांक :

मी अशी प्रतिज्ञा करतो/ करते की, मी अर्जात नमूद केलेली माहिती व दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्वसूचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**